शैक्षणिक वर्ष २००८-०९
नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा /
तुकडयांना मंजूरी

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
आदेश क्रमांक एनजीसी २००८/(२१५/०८)/मशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ जुन, २००८

पहा:-१) शासन निर्णय क्रमांक-एनजीसी२००८ / (१८/०८) / मशि-३,
दि.३०.०१.२००८ (Task Force)
२) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. एनजीसी / ०८-०९ /नवि महा अतु / मान्यता / मवि २-३, दि. ९.०५.२००८

## आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(४) नुसार राज्यातील विद्यापीठांनी शासनाकडे नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांना मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचे असतात, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी राज्यातील विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासन निर्णय क्रमांक-एनजीसी२००८ / (१८/०८) / मशि-३, दि.३०.०१.२००८ अन्वये स्थापित कृतिसमितीद्वारे छाननी करण्यात आली. समितीचे अभिप्राय / शिफारशी व विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडयांना सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

(१) ज्या महाविद्यालयांना नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडया मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

(२) संबंधित विभागीय सहसंचालकांचे हमीपत्र सादर केल्याविषयीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठांने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

(३) महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

(४) विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग महाविद्यालयाने नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात.

(५) शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून सदरची मान्यता देण्यात येत आहे. यावर्षी नवीन विषय. / विद्याशाखा / तुकडी सुरु न करणा-या महाविद्यालयांची नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांची ही मान्यता आपोआप रद्द झाली असे समजण्यात येईल.

(६) * अशी खुण असलेल्या महाविद्यालयातील नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांना नकारात्मक शिफारस असली तरी सदरच्या नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांना स्थानिक विद्यार्थ्यांसाठी आवश्यकता विचारात घेऊन मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

## पुणे विद्यापीठ

पुणे जिल्हा

| अक्र | महाविद्यालयांचे नाव व पत्ता | नवीन विद्याशाखा |
|---|---|---|
| १. | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे–३० | १. प्रथम वर्ष बी.बी.ए. |
| २ | श्रीमती सुधाताई मांडके कला व वाणिज्य महाविद्यालय, ४७/८, पौड रोड, पुणे–३८. | १. प्रथम वर्ष बी.सी.ए. |
| ३ | जेनिसीस इन्स्टिटयूट ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट, ७११, शंकरशेठ रोड, भवानीपेठ, पुणे. | १. प्रथम वर्ष बी.सी.ए.<br>२. प्रथम वर्ष विज्ञान–संगणकशास्त्र (बी.सी.एस.) |
| ४ | अरिहंत कॉलेज ऑफ कॉमर्स आर्टस अँण्ड सायन्स, तोडकर कॉम्प्लेक्स, पहिला मजला बिबवेवाडी, पुणे–३७ | १.प्रथम वर्ष बी.सी.एस.<br>२. एम.सी.ए. |
| ५ | मॉडर्न कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँण्ड बिझनेस स्टडिज, शिवाजीनगर, पुणे–५. | १. प्रथम वर्ष वाणिज्य |
| ६ | अण्णासाहेब मगर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हडपसर, पुणे–२८ | १. बॅचलर ऑफ फॉरेन ट्रेड |
| ७ | डॉ. आंबेडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, येरवडा, पुणे–४११ ००६. | १. वाणिज्य–बी.बी.ए. |
| ८ | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे महाविद्यालय, (कला, वाणिज्य व विज्ञान) सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे. | १. पी.जी. (डिप्लोमा)बॅकिंग अँण्ड फायनान्स<br>२. बी.बी.ए–(व्यवसाय प्रशासन)<br>३. एम.सी.ए. |
| १० | कै. तुकाराम धोंडिबा पठारे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चंदननगर, पुणे–४११ ०१४ | १. प्रथम वर्ष विज्ञान–(संगणकशास्त्र) |
| ११ | पवना शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे–३९. | १. वाणिज्य बी.सी.ए. |
| १३ | कन्नड संघाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, एरंडवणे, पुणे–३८. | १. विज्ञान विद्याशाखा |
| १४ | कस्तुरी शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, शिक्रापूर, ता. शिरूर, | १. प्रथम वर्ष विज्ञान विद्याशाखा |